# डॉ. आंबेडकर यांच्यावर शिवाजी विद्यापीठात अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. आंबेडकर यांचे विचार यावरील पदव्युत्तर पदविका व भारतीय संविधान यावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र येथे या अभ्यासक्रमाचे अध्यापन व अध्ययन चालणार आहे. प्रवेशासाठी दहावी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र आहेत. डॉ. आंबेडकरांच्या विचारावर जगभरातील विविध विद्यापीठांमध्ये अभ्यास व संशोधन सुरु आहे. प्रवेशासाठी केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# घाट स्वच्छतेतून २० टन कचरा उठाव

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ७५० स्वयंसेवकांनी पंचगंगा घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविताना दिवसभरात सुमारे २० टन कचरा साफ केला. महापुराच्या पाण्याने काठावर आणून टाकलेल्या कचऱ्याचा उठाव झाल्याने घाटाचा परिसर स्वच्छ झाला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी सकाळी नऊ वाजता पंचगंगा घाट परिसराच्या स्वच्छता मोहिमेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी एनएसएस स्वयंसेवकांच्या साथीने स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. मोहिमेमध्ये सातारा जिल्ह्यातून आलेल्या स्वयंसेवकांसह स्थानिक ७५० स्वयंसेवकांनी ४० कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला. प्लास्टिक साहित्य, झाडेझुडपे, काचेच्या बाटल्या, तसबिरी, तुटक्या-फुटक्या मूर्ती, नदीला अर्पण केलेले नारळ, गाळ-चिखल आदी प्रकारच्या मलब्याची स्वच्छता करण्यात आली. पंचगंगा घाट परिसराबरोबरच राजाराम बंधारा, पंचगंगा स्मशानभूमी या परिसरातही स्वच्छता करण्यात आली. शहरातून घाटाकडे येणाऱ्या गंगावेश ते शिवाजी पूल रस्त्यासह पाणंद रस्ता, तोरस्कर चौक या ठिकाणीही स्वच्छता करण्यात आली. दरम्यान, गेल्या दोन दिवसांत रंकाळा तलाव परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेंतर्गतही सुमारे वीस टन कचरा उचलण्यात आला आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे पंचगंगा घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यावेळी सहभागी स्वयंसेवकांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. डी.के. गायकवाड आदी.

## पाच दिवसांत ११ गावांमध्ये मोहीम

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत २६ ऑगस्टपासून कोल्हापूर शहरासह शिरोळ तालुक्यातील पूरबाधित ११ गावांत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यामध्ये नृसिंहवाडी, अर्जुनवाड, औरवाड, राजापूर, खिद्रापूर, आलास, कवठेगुलंद, कनवाड, घालवाड, गणेशवाडी, अब्दुललाट या गावांचा समावेश राहिला. या मोहिमेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ८०० विद्यार्थी आणि ४०० विद्यार्थिनी अशा सुमारे १२०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध पूरग्रस्त ठिकाणीसुद्धा नजीकच्या महाविद्यालयातील एनएसएसच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबविली. स्वच्छतेबरोबरच सर्वेक्षण आणि समुपदेशनाचे कार्यही या स्वयंसेवकांनी केल्याची माहिती डॉ. डी. के. गायकवाड यांनी दिली.

# विद्यापीठाने मागवली पूरग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

ऑगस्टमध्ये कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांत आलेल्या महापुरामध्ये ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना पुराचा फटका बसला अशा विद्यार्थ्यांची माहिती शिवाजी विद्यापीठाने कॉलेज प्रशासनाकडून मागवली आहे. याबाबतचे पत्र विद्यापीठाने प्राचार्यांना पाठवले आहे. कॉलेजनिहाय पूरग्रस्त विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाकडे आल्यानंतर विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सवलत व मदतीच्या धोरणाबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.



## कॉलेजनिहाय यादीअंती मदतीचे धोरण ठरणार

महापुरात कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील अनेक गावे पाण्याखाली गेली. शेतीसह घरे व जनावरांचे नुकसान झाले. कोल्हापूर शहरातील, शुक्रवार पेठ, कदमवाडी, जाधववाडी, रमणमळा, नागाळा पार्क, शाहूपुरी, सुतारमळा येथील घरांमध्येही पाणी शिरले, तर सांगलीतील हरिपूर, ब्रह्मनाळसह शिरोळ तालुक्यातील औरवाड, कुरुंदवाड, नृसिंहवाडी यासह गावठाणातील रस्त्यांवर पाणी आले. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेतात. या दोन जिल्ह्यांतील कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या कुटुंबांवर महापुरामुळे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यांची घरे कोसळली आहेत. शेतीचे नुकसान झाले आहे. जनावरे वाहून गेली आहे. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक पातळीवर आर्थिक दिलासा देता यावा यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे पूरग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कॉलेजमार्फत पूरग्रस्त विद्यार्थ्यांची नावे, कौटुंबिक माहिती, आर्थिक स्थिती याबाबतची माहिती पाठविण्याचे काम सुरू आहे.

> शिवाजी विद्यापीठातर्फे कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातून कॉलेजनिहाय अहवाल मागवला आहे. अद्याप ही माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. येत्या आठवड्यात सर्व माहिती घेऊन एकत्रित अहवाल तयार केला जाणार आहे.
>
> **डॉ. विलास नांदवडेकर,**
> कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

# ‘सहकार’ पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सी. बी. सी. एस. अभ्यासक्रमाप्रमाणे प्रा. डॉ. रुपा शहा व सोलापूर येथील प्राध्यापक डॉ. बी. एच. दामजी यांनी लिहिलेल्या बी. ए. भाग-२ (सेमिस्टर ३ व ४) च्या 'सहकार' या विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते एका अनौपचारिक कार्यक्रमामध्ये करण्यात आले.



‘सहकार’ या विषयावरील प्रा. डॉ. रुपा शहा यांच्या २५ व्या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. शहा, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एम. एस. देशमुख आदी.

## बी. ए. भाग २च्या अभ्यासक्रमातील पुस्तक प्रकाशित

फडके प्रकाशनसाठी सहकार या विषयावर प्रा. डॉ. शहा यांनी लिहिलेले हे पंचवीसावे पुस्तक असल्याने कुलगुरू प्रा. डॉ. शिंदे यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यापीठातील कुलगुरूंच्या दालनात झालेल्या या प्रकाशन समारंभाला प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे व डॉ. गिरीष कुलकर्णी, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. एस. देशमुख, वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. प्रविण बाबर, कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक विलास सावंत व मिलींद कोळी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

पुस्तक प्रकाशनानंतर कुलगुरू शिंदे यांनी अभ्यासक्रमात होणाऱ्या बदलानुसार फडके प्रकाशन सातत्याने विद्यार्थ्यांना विविध विषयांची पुस्तके उपलब्ध करून देत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कुलगुरू शिंदे म्हणाले, ‘महावीर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाल्यावरही प्रा. डॉ. शहा यांनी आपला हात लिहिता ठेवला आहे आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थीवर्गाला व्हावा यासाठी त्या सतत प्रयत्नशील आहेत ही अभिमानास्पद बाब आहे.’

प्रारंभी प्रा. डॉ. शहा यांनी सर्वांचे स्वागत केले. पंचविसावे पुस्तक लिहिण्यामागची भूमिका त्यांनी विषद केली. प्रकाशक मंदार फडके यांनी आभार मानले.